
पुस्तक परीक्षण



वास्तवदर्शी चित्रपट

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या वास्तवदर्शन पाठ्यवृत्ती-९८ अंतर्गत 'लोकसत्ता'चे उपसंपादक-चित्रपट समीक्षक श्रीकांत बोजेवार 'वास्तवदर्शी चित्रपटसूची'द्वारे १९४७ ते १९९७ पर्यंतच्या हिंदी-मराठी चित्रपटांची सूची सादर करत आहेत.

प्रत्येक चित्रपट अभ्यासक आणि चित्रपट-क्षेत्रातील संबंधित व्यक्तीला माहितीपर ठरेल अशा 'वास्तवदर्शी चित्रपटसूची' या पुस्तकात लेखक, वाचक-समीक्षक ते चित्रपट अभ्यासू म्हणवून मनोगताद्वारे विषयाकडे सरकतात. सुरुवातीला 'वास्तववाद-प्रारंभिक प्रवास' या शीर्षकांतर्गत सत्यजित राय यांचा वास्तववाद यावर जागतिक स्तरावर फिट बसणारा 'The raw material of the cinema is life itself... for the truly serious, socially conscious filmmaker, there can be no prolonged withdrawal into fantasy. He must face the challenge of the Contemporary reality, examine the facts, probe them, sift them and select from them the material to be transformed into the Stuff of cinema' हा कोट देतात. या परिच्छेदात राय यांनी रिॲलिस्टिक, ऑफ बीट, पॅरलल, आर्ट असा शब्द कोठेच वापरलेला दिसत नाही. फक्त सिनेमा म्हटलंय. There are only two types of cinema. Good and bad. (याला दिग्दर्शकाची करणी आणि समीक्षकांची लेखणी कारणीभूत ठरते ती गोष्ट वेगळी) हे लेखकाने मांडलंय. परंतु गुड आणि बॅड सिनेमा म्हणजे नेमकं काय ते विस्तारीत केलेलं नाही. नंतर सिनेमाचा जन्म, मूकपट, बोलपट असा प्रवास आहे.

'वास्तववादाचा जन्म' या सदरात वास्तव आणि वास्तववाद हे दोन शब्द सिनेमाच्या आधीपासून चित्रकला आणि साहित्यात अस्तित्वात असल्याचे लेखक सांगतात. पुढे त्याचे पडसाद जगभर वेगवेगळ्या भाषेत उमटले. रॉबर्टो रोझेलिनीच्या *रोम-ओपन सिटी* (१९४५) या चित्रपटाद्वारे दुसऱ्या महायुद्धानंतर नववास्तववाद ऊर्फ न्यू वेव्ह सिनेमा अशा वेगवेगळ्या नावाने जगभर पोहचला. 'जे आहे आणि जसे आहे तसे दाखविणे' ही वास्तवादाची व्याख्या लेखक करत नाही. कारण त्यामुळे वास्तवाची मक्तेदारी माहितीपट, वृत्तचित्रे लघुपटांकडे जाईल. हे ते नमूद करतात. त्यातही वास्तववाद (रिॲलिझम) आणि दस्तावेजीकरण (डॉक्युमेंटेशन) यातही मूलतः फरक असल्याचे ते सांगतात.

द्वितीय महायुद्ध व त्याचे परिणाम या सदरात हॉलीवूड आणि युरोपियन चित्रपटात फरक सांगताना लेखक विरह, ताटातूट, पुनर्मिलन विरुद्ध उद्ध्वस्त समाजजीवन, बदललेल्या जीवननिष्ठा, युद्ध समस्या, यातना, एकांतवास, अर्थव्यवस्था परिणाम मांडतो.

'नववास्तववाद' सदरात विस्तेरियो डिसिकाच्या *द चिल्ड्रेन आर वॉचिंग अस* (१९४२) या चित्रपटामुळे भारतात नववास्तवादाचा झालेला परिचय. पुढे *बायसिकल थीव्हज* (१९४८), *शू शाईन बॉइज* (१९४६), *अंबर्टो डी* (१९५१) या द्वारे वाढत गेला. परंतु पुढे या चित्रपटावर 'साम्यवादी विचारांनी प्रेरित' हा शिक्का बसल्यावर दिग्दर्शक डिसिका हॉलीवूडकडे वळला. या युद्धात सर्वाधिक नुकसान जपानचे झाले. त्याचे पडसाद चित्रपटातूनदेखील उमटले आणि याचा पहिला मान अकिरा कुरोसाव यांच्या *राशोमान* या चित्रपटाला लेखक देतो. 'पहिला चित्रपट महोत्सव' या सदरात १९५२ साली भारतात पहिला जागतिक चित्रपट महोत्सव भरला. आणि त्याचा भारतीय निर्माता-दिग्दर्शकांना झालेला फायदा, प्रेरणेने तयार झालेले चित्रपट आहेत. आणि कालपरत्वे सेमी कमर्शियल, सेमी एक्स्पेरिमेंटल या प्रवाहात हिंदीत उगम आहे.

'वास्तववादाकडे...'मध्ये धाडसाने नवीन विषय घेणारे बिमल रॉय, गुरुदत्त, हृषिकेश मुखर्जी, बासू भट्टाचार्य, बी.आर. चोप्रा, झिया साहदी, ख्वाजा अहमद अब्बास, व्ही. शांताराम, राज कपूर यांचा प्रवास आहे.

'चित्रपटाची भाषा, शैली व स्वरूप'मध्ये चित्रपटाची तांत्रिक भाषा असून त्यात क्लोजअप, शॉट, अँगल आहेत. लाईट, ध्वनी यामुळे मिळणारे मूर्त रूप आहे. त्यात या भाषेद्वारे कथानकाचा आशय विषद करण्याची कला आहे. देशभर पसरत चाललेली फिल्म सोसायटी चळवळ आहे.

'वास्तववादी'मध्ये 'जीवनाचे प्रतिबिंब उमटले पाहिजे' ही ढोबळ व्याख्या आहे. मनोरंजन गुन्हा नसून त्याची जीवनाशी जोडलेली नाळ, कम्युनिकेट करतो. तो चांगला चित्रपट, औद्योगिक क्रांती, बदलते समाजचक्र, FFC, NFDCचे पाठबळ यामुळे वाढणारी समांतर चित्रपटांची चळवळ आहे. 'व्यावसायिक चित्रपटांना देणगी'मध्ये विदेशी चित्रपटांच्या तोडीचे चित्रपट, बरोबरी, व्यावसायिक तसेच या समांतर चित्रपटामधील एकाच वेळेला काम करून यश मिळवणारे अदाकार आणि दिग्दर्शक आहेत.

'मराठीतील वास्तववाद'मध्ये सुरुवातीला पारंपारिक संस्कृती दिसून आली. ती लेखक-दिग्दर्शकांमुळे. परंतु कुटुंब या मूळ बीजाभोवती शहराचे औद्योगीकरण, शिक्षण, वातावरण बदल यांचा होणारा परिणाम दिसून आला. त्यावर हिंदी चित्रपटांची पडलेली सावली. बाई, बाटली, सरपंच आणि तमाशा हे दळले गेलेले दळण. आज ज्या मराठी संस्कृतीच्या भरवशावर मराठी चित्रपट आपले वेगळेपण टिकवून होता त्याला घरघर लागल्याचे लेखकाने म्हटले आहे. मराठीवरील इंग्रजी पगडादेखील लेखक येथे मांडतो. पुढे १९४७ ते १९९७पर्यंत वास्तववादी चित्रपटांची निर्माता, दिग्दर्शक, पटकथा, संगीत, कलाकार, कथानक सारांश अशी यादी सादर करतो ती *डॉ. कोटणीस की अमर कहाणी*, *स्वयंसिद्धा*पासून *दरमियां*, *गुडीया*, *आस्था*पर्यंत थांबते. त्यानंतर लेखक मराठी चित्रपटांची त्याच कालावधीतील यादी देतो ती *लोकशाहीर राम जोशी*, *जय मल्हार*पासून *लिमिटेड माणुसकी*, *कथा दोन गणपतरावांची*पर्यंत येऊन थांबते.


सरतेशेवटी लेखक 'वास्तवदर्शी सिनेमा-सद्यस्थिती' मांडताना फसलेल्या चित्रपटांचे अपयश चार भागात विभागले आहे -

१) तांत्रिकदृष्ट्या चांगले नसलेले चित्रपट, २) अगदीच प्रादेशिक, विशिष्ट समूहांपुरते अथवा विशिष्ट राज्यातच कळतील असे विषय असलेले चित्रपट, ३) प्रायोगिकतेचा कळस करीत केवळ तंत्राचे प्रदर्शन करणारे दुर्बोध चित्रपट, ४) आशय पोहोचविण्यात तोकडे पडलेले चित्रपट.

पुढे सॅटेलाईट वाहिन्या, वाढलेली महागडी निर्मिती व्यवस्था, कलाकारांची बदललेली मानसिकता, विदेशी बाजारपेठ नमूद करतो.

परंतु शेवटी "चित्रपट ही वास्तवावरील एक प्रतिक्रिया असते ती प्रामाणिकपणे व्यक्त करण्याविषयी वाटते तोवर वास्तवाला मरण नाही. चढ-उतार जरूर असतील!" या लेखकाच्या समर्पक शेऱ्याने पुस्तक समाप्त होते.

लेखकाने या पुस्तकावर मेहनत घेतल्याचे लक्षात येते. अवघ्या १२७ पानात त्यांना त्यांचे विचार मांडताना काटेकोर कसरत करावी लागली आहे. त्यातही त्यांनी दिलेल्या वास्तवदर्शी हिंदी आणि मराठी चित्रपटांच्या यादीबरोबर सगळेच सहमत होतील असे नाही. तसेच सामान्य बुद्धीच्या चित्रपट पाहणाऱ्या प्रेक्षकांसाठी पुस्तकातील भाषा थोडी सोपी पाहिजे होती. मुखपृष्ठ आणि मलपृष्ठावर लेखकाने निवडक चित्रपटांचे फोटो घेतले आहेत. तपशिलाच्या मानाने पुस्तकाची ८० रुपये किंमत कमी वाटते.



चरित्रकहाणी मधुबालाची

हिंदी चित्रपटसृष्टीत मधुबाला हे नाव तिचे स्वर्गीय लावण्य आणि सहजसुंदर अभिनयाद्वारे आजही समीक्षकांच्या लक्षात आहे. तिच्या निधनाला तीस वर्षांहून अधिक काळ लोटला असून अजूनपर्यंत तिच्यावर आधारित मराठीत एकही पुस्तक उपलब्ध नाही. ही उणीव चित्रपटसृष्टी अभ्यासक शशिकांत किणीकर यांनी 'मधुबाला' या पुस्तकाद्वारे भरून काढली आहे. 'दास्तान-ए-नौशाद', 'जयराज: जीवनाची भरती-ओहोटी' या पुस्तकांनंतर त्यांनी 'मधुबाला' या पुस्तकाची दुसरी आवृत्ती प्रकाशित केली आहे. यात लेखक वैयक्तिक जीवनातील मधुबाला, तिचे सहकलाकार, निर्माता-दिग्दर्शक यांच्या माहितीबरोबर दुर्मिळ फोटोची जोड देतात. प्रस्तावनेत बनी रूबेन मधुबालाला न्याय देण्याचा प्रयत्न केल्याचे मांडतात. तसेच तिच्या परिचितांनी केलेली मदत विस्तृत केली आहे. परंतु तिच्या घरच्यांचा असहकारदेखील सोबत नमूद केला आहे.

प्रास्ताविकेत लेखक पुस्तकाचा जन्म आणि मधुबालाच्या घरच्यांचा असहकार मांडतात. 'मधुबाला' पुस्तकाची सुरुवात फोटोंनी होते. त्यात मधुबालाचा बालकलाकार म्हणून पहिला चित्रपट *बसंत* नंतर *राजपुतानी*चे फोटो आहेत. पुढे तिचा वयोपरत्वे बदलणारा सुंदर चेहरा आहे. याला चित्रपटातील भूमिकेची पार्श्वभूमी आहे. न झालेले चित्रपट फोटो सदरात *नजमा, नया दौर, चलाक* आहे. अभिनेत्यांबरोबर सहप्रवासमध्ये तिचे विविध चित्रपटांतील पुरुष कलाकार आहेत. जीवनसाथी किशोरकुमारमध्ये *चलती का नाम गाडी, झुमरु*चे फोटो आहेत.

'दिल्लीनून दिल्लीकडे'मध्ये तिचा जन्म आई-वडील आणि मुंबईत *बसंत* चित्रित झाल्याचे वर्णन आहे. '*निलकमल*ची नायिका'मध्ये दिल्ली आकाशवाणीवरील काम, कामासाठीची धडपड आणि *निलकमल* चित्रपट आहे. 'लोकप्रियतेच्या शिखरावर'मध्ये *दौलत*, दिग्दर्शक मोहन सिन्हा यांचे चार चित्रपट, बी ग्रेट आपटलेले चार चित्रपट. *महल*च्या स्क्रीनटेस्टसाठी तिचा झालेला अव्यवस्थित मेकअप आणि नंतर या चित्रपटाने घडवलेला इतिहास आहे.

'पत्रकारांच्या चक्रव्यूहात' वडील अताउल्ला यांनी केलेली पिळवणूक, *महल* हातचा गेल्याने मुरेखाचा मधुबालावरील खार, रणजीत स्टुडियोचे उतरवलेले उपकार देव आनंदच्या सांगण्यावरून तिचे इंग्रजी शिकणे. *निराला* चित्रपटाच्या सेटवर मजहर खान या जुन्या कलाकाराचा आणि त्यानंतर पत्रकारांचा केलेला अपमान. पत्रकारांनी तिच्याविरुद्ध थोपटलेले दंड, घातलेली बंदी आणि कोंडी. करंजियांच्या मदतीने उठवलेली बंदी आहे. 'दिलीपकुमार बरोबर'मध्ये तिचा दिनक्रम, स्वार्थी वडिलांवरील तिचे आंधळं प्रेम, बुरखा घालून शॉपिंग-चित्रपटाला जाणे, वेळेची पक्की, प्रेमनाथचे एकतर्फी प्रेम, दिलीपकुमारवरील तिचे प्रेम-भेटणे. त्यामुळे प्रेमनाथ × दिलीपकुमार, वैर निम्मी-दिलीपकुमार-मधुचा त्रिकोण, वडील आणि दिलीपच्या प्रेमात सापडलेली मधु, *नया दौर*ची केस आहे. *मुगल-ए-आझम*मध्ये या चित्रपटाचे मेकिंग आहे. दिलीप × नर्गिसचे *हलचल* दरम्यानचे मतभेद, एम.ॲंड टी यांचा *अनारकली* आणि फिल्मीस्तानचा *अनारकली मुगल*...साठी स्पर्धेत होते. *अनारकली*मध्ये मधुचे लवकर दमणे, गायन आणि नृत्य शिकणे, स्वार्थी-संधीसाधू वडिलांना बडगा मिळणे; शीशमहलचा सेट, महागडा चित्रपट, *मुगल-ए-आझम*ची निर्मिती कथा, मधुबाला = अनारकली हे झालेले समीकरण आहे.

'आजारी एकाकी'मध्ये सेटवरील तिचा लहरीपणा, आजाराची उचल, अर्धवट रखडलेले चित्रपट आहेत, निर्मिती म्हणून तिने तयार केला *नाता* नंतर *महलों के ख्वाब* हे पडीक चित्रपट. बहुत दिन हुए यांं प्रिमियरसाठी तिचे उपस्थित राहणे, शारीरिक स्थिती जाणून चित्रपट पटापट पूर्ण करणे, पहिला हृदयविकाराचा झटका आहे.

'फसलेला विवाह'मध्ये मधुबालाचा जीवनसाथी शोध आहे. तिचे कमाल अमरोहींना विचारणे, किशोरकुमारचा जात बदलून तिच्याबरोबरील विवाह, आजारपणात दोघांचे पटेना, चित्रपटापासून तोपर्यंत तिचे लांब जाणे. 'अखेरचे दिवस' मध्ये दिलीपकुमारचा पण मोडून तिला भेटायला जाणे, केदार शर्मांनी एक गाणे तिला कायमचे देणे, हृदयविकाराचा दुसरा झटका आणि मृत्यू आहे. त्यानंतर तिच्या चित्रपटांची वर्गवारी सूची आहे. पुढे मधुबालाचे आत्मचित्रण, प्रेम, भूमिका पेहराव, प्रेमाची व्याप्ती, आनंदाचे क्षण यावर मनोगत असून. तिला वाहिलेल्या श्रद्धांजलीत लता मंगेशकर, निरुपा रॉय, शक्ती सामंत, देव आनंद, पी. एन. अरोरा, अजित, अशोककुमार, राज खोसला, सुनील दत्त, प्रेमनाथ, बलराज सहानी, केदार शर्मा, बी.के. करंजिया आहेत.

मोहक मधुबालाची छबी मुखपृष्ठाचे आकर्षण ठरते. तर लेखकाने चरित्र कहाणीत घातलेले संवाद मात्र खटकतात. *मुगल-ए-आझम* या सदरात लेखकाने तिला सेटवर आलेला हृदयविकाराचा झटका नमूद केला नसून तो 'आजारी आणि एकाकी' सदरात चुकीच्या जागी ठरतो. तसेच छापखान्यातील चुकीत हिरा सिंग रवैल (एच. एम. रवैल) यांचे नाव खैल म्हणून छापून आले आहे.

मधुबालाविषयी माहिती 'मधुबाला' या पुस्तकातून देऊन लेखक वाचकांना संतुष्ट करायचा प्रयत्न करतो हे मात्र नक्की.

□ हर्षदा वेदपाठक